नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 18/06/2020 (गुरूवार)
(सकाळ)

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 17 कि.मी अंतरावर चिखलागड येथे दिनांक 16/06/2020 ते दिनांक 17/06/2020 चे 18:00 वा. ते 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जितेन्द्र जिवनराव सोहलिर्या, वय 29 वर्ष, रा. चिखलागड यांनी त्यांची एमएच–31/ऐएस– 437 क्रमांकाची हिरो होन्डा कंपनीची मोटरसायकल घरा समोर हॅण्डल लॉक करून उभी ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 30,000/–रू. ची मोटरसायकल चोरून नेले.
सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 2 कि. मी अंतरावर अर्जुन नगर काटोल येथे दिनांक 17/06/2020 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कमलाबाई पुंडलीकराव धुर्वे, वय 60 वर्ष, रा. अर्जुन नगर, काटोल व आरोपी नामे– प्रदीप पुंडलीकराव धुर्वे, रा. अर्जुन नगर काटोल हे दोघेही आई व मुलगा असून आरोपीने 'इलेक्ट्रीक बिल 3,000/– रू. आले मला पैसे दे' असे म्हटले असता फिर्यादीने म्हटले 'माझ्याजवळ पैसे नाही मी, थोडे थोडे बिल भरीण' असे म्हणताच आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केली व खरपाचा वरवंटा हातात घेवुन फिर्यादीच्या डोळयाचे वर कपाळावर मारून जखमी केले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर मौजा खैरीमहार येथे दिनांक 16/06/2020 चे 14:30 वा. ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद बाबुलाल शेन्डे, वय 35 वर्ष रा खैरीमहार हा शेतातुन वडीलासह स्वतःचे घरी जात होता. दरम्यान गावातील आकाश हा फिर्यादीचे मित्र नामे– दुर्योधन सोबत उभा असता फिर्यादीने आकाश यास म्हटले की, 'तु मागे दारू पिवुन माझ्या घरावर आला, आता माझ्या सोबत झगडा कर' असे म्हटल्याचे कारणावरून आरोपी नामे– शुध्दोधन रामदास पाटील, वय 39 वर्ष, रा. खैरीमहार याने फिर्यादी सोबत वादविवाद करून फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बाबुलाल राठोड 7798344919 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर